# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**कोळी समाजाच्या विकासासाठी निर्माण झालेल्या सहकारी सोसायट्या डबघाईला आल्याबाबत**

**(१) १२२४ (२२-१२-२०१४). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थकलेली कर्ज, डीझेलच्या परवान्यामध्ये झालेले आर्थिक गोंधळ, संस्थामधील दोन गटांतील प्रतिष्ठेची लढाई, मासळीचा तुटवडा अशा असंख्य कारणांमुळे कोळी समाजाच्या विकासासाठी निर्माण झालेल्या या सहकारी सोसायट्या डबघाईला आल्या असून काही बंद पडल्या असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मुंबई व कोकण किनारपट्टीच्या भागात सुमारे २५ लाख लोक प्रत्यक्ष मासेमारीच्या व्यवसायात असल्याने त्याच्या उदरनिर्वाहासाठी या सोसायट्यांना पुर्नजीवीत करण्यासाठी शासन काही उपाययोजना करणार आहे काय

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) राज्यातील मच्छिमार सहकारी संस्थांना त्यांच्या व्यवसायात सहाय्य करण्यासाठी पुढील प्रमाणे योजना राबविण्यात येतात.

(१) मासेमारी नौकांचे यांत्रिकीकरण करण्यासाठी ३५ टक्के अनुदान व ५५ टक्के कर्ज उपलब्ध करुन देण्यात येते.

(२) समुद्रात मोसेमारीसाठी, मासेमारी नौकांना लागणाऱ्या हायस्पीड डिझेल तेलावरील मुल्यवर्धीत विक्रीकरणाची १०० टक्के प्रतिपूर्ती करण्यात येते.

(३) मच्छिमार संस्थांना बर्फ कारखाना, शीतगृहे तसेच मासळीची जलद वाहतूक करण्यासाठी ट्रक, टेम्पो खरेदी करण्याकरिता अर्थसहाय्य देण्यात येते.

(४) मत्स्यबीज / कोळंबी संचयन, पूरक खाद्ये, खते, मासळी खरेदी-विक्री, मच्छिमार साधनांची खरेदी-विक्री व वाहतूक सुविधा इत्यादीसाठी १०० टक्के भाग भांडवल अर्थसहाय्य दिले जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी परिसरातील गौणखनिजात स्वामित्वधनासाठी (रॉयल्टी) भिवंडी प्रांत अधिकारी यांनी नोटीसा बजावल्याबाबत**

**(२) २९०१ (२२-१२-२०१४). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी परिसरातील गौणखनिजात स्वामित्वधनासाठी (रॉयल्टी) भिवंडी प्रांत अधिकारी यांनी माहे सप्टें/ऑक्टोंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान तिप्पट दंडाच्या नोटीसा १२५ विट व्यावसायिकांना बजावण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दंडाच्या आकारणीविरुध्द संबंधितांनी मा.महसूल मंत्री, जिल्हाधिकारी व प्रांत अधिकारी योचेकडे निवेदने देऊन आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दंडाच्या नोटीसाबाबत फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-१०-२०१५) :** (१) विटभट्टीधारकांनी विटभट्टीसाठी आवश्यक असणारी परवानगी घेतली नसल्यामुळे उप विभागीय अधिकारी भिवंडी यांनी एकूण २३० विटभट्टी मालकांविरुध्द दंडात्मक कारवाई केली आहे.

(२) व (३) दंडाचे आदेश रद्द करण्याबाबत जिल्हाधिकारी ठाणे तसेच उप विभागीय अधिकारी भिवंडी यांना निवेदने प्राप्त झाली आहेत. सदर निवेदनाच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी भिवंडी यांनी संबंधित अर्जदार यांना दंडाचे आदेश रद्द करण्याबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे अपील दाखल करण्याबाबत कळविले आहे.

---

**नाशिक जिल्ह्यातून जाणारी पावरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची अति उच्च दाबाची वाहीनी ही बागायती जमिनींमधून न घेता जिरायती जमिनींमधून घेण्याबाबत**

**(३) ६००७ (०४-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातून जाणारी पावरग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची अति उच्च दाबाची वाहीनी ही बागायती जमिनींमधून न घेता जिरायती जमिनींमधून घेण्याची जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी माहे नोव्हेंबर,२०१४ मध्ये जिल्हा प्रशासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत फेर सर्वेक्षण करुन जिरायती जमिनीमधून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-१०-२०१५) :** (१) होय,
(२) पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.यांचे मार्फत नाशिक जिल्ह्यात सदरची पारेषण वाहिनी उभारली जात आहे. निफाड, दिंडोरी व चांदवड तालुक्यामध्ये सदरची वाहिनी द्राक्ष बागांमधून जात असल्याने तेथील शेतकऱ्यांचा त्यास तीव्र विरोध आहे. त्या भागातील शेतकऱ्यांची मागणी व लोकप्रनिधीच्या विनंतीवरुन सदर वाहिनी मार्गाचे पॉवर ग्रीड कॉर्पोरेशनकडून फेर सर्वेक्षण करण्यात आले. परंतु फेरसर्वेक्षणामध्ये नवीन मार्गाच्या वाहिनीची लांबी अंदाजे २६.५ कि.मी. ने वाढत आहे. तसेच ती वन जमिनीतून जात असल्याने तांत्रिक, आर्थिक आणि कायदेशीर बाबींचा विचार करता नवीन मार्गाचा विचार करणे शक्य नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यात लोकांनी अकृषीक (एनए) परवानगी न घेता अनधिकृत घरे बांधल्याबाबत

**(४) १०९६४ (०७-०४-२०१५). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यात अनधिकृत बांधकामाचा सर्व्हे सुरू असून आतापर्यंत ७६ हजार इमारतींचा सर्व्हे करण्यात आला असता १२ हजार लोकांनी अकृषीक (एनए) परवानगी न घेता घरे बांधण्यात आल्याचे उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील सर्वच अनधिकृत बांधकामाचा सर्व्हे करून अकृषिक जमिनीवर बांधण्यात आलेल्या बांधकामाला दंड आकारून कामे नियमित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-१०-२०१५) :** (१) पुणे जिल्ह्यात आतापर्यंत सर्वेक्षण करण्यात आलेल्या ७३५८५ इमारतीपैकी संशयित/पूर्णत: अनाधिकृत असलेल्या १२९५८ बांधकामांना नोटीसा बजावणेत आलेल्या आहेत, हे खरे आहे.
(२) नगर विकास विभागाच्या दि.३१/०३/१५ च्या शासन निर्णयान्वये पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकारणाची स्थापना करण्यात आलेली असून नियोजन प्राधिकरण म्हणून पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण यांची नियुक्ती करणेत आलेली आहे. तसेच विकासावर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२,५३,५४,५५ व ५६ यामधील तरतुदीनुसार विहित असेलेले अधिकार नियोजन प्राधिकरणाकडे असल्याने त्यानुसार पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील इमारतीच्या

सर्वेक्षणांचे कामकाज पूर्ण झालेल्या इमारतीचे पंचनामा व त्याअनुषंगिक कागदपत्रे सदर प्राधिकरणाकडे वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील अनधिकृत बांधकामांपैकी सहा.संचालक नगररचना, पुणे यांच्या अभिप्रायानुसार नियमित करण्यायोग्य अनधिकृत बांधकामे असल्यास अशा प्रकरणी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाजनकोने खाजगी कोलवॉशरीज कडून**
**कोळसा घेणे बंद केल्याबाबत**

**(५) १३५१६ (०४-०४-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घुस, सास्ती, पांढरकवडा येथे असलेल्या खाजगी कोलवॉशरीज कडून निकृष्ट दर्जाचा कोळसा पुरविण्यात येत असल्यामुळे महाजनकोने खाजगी कोलवॉशरीज कडून कोळसा घेणे बंद केले असल्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील हजारो कामगार बेरोजगार झाल्याचे माहे जानेवारी २०१५ च्या पहिल्या आठवडयात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चोकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बेरोजगार झालेल्या कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येत आहे तसेच जिल्ह्यातील बंद पडलेल्या खाजगी कोल वॉशरीज महाजनको स्वतः चालविण्यासंदर्भात विचाराधीन आहे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-०९-२०१५) :** (१) महानिर्मिती कंपनीस वॉशरी ऑपरेटर्सकडून निर्धारीत दर्जानुसार कोळसा प्राप्त होत नसल्याचे आढळून आल्याने दि. ३१.७.२०११ पासून वॉशरी ऑपरेटर्सना कच्चा कोळसा धुण्यासाठी देण्याचे कंपनीने बंद केले परिणामी कोल वॉशरीज बंद झाल्यामुळे खाजगी ऑपरेटर्सकडून नियुक्त केलेल्या २९७ स्थायी व ५६३ कंत्राटी कामगारांच्या रोजगारावर परिणाम झाला आहे.

(२) होय.

(३) बेरोजगार झालेल्या कामगारांना कामगार कायद्यानुसार कायदेशीर देणी प्राप्त व्हावीत म्हणून अपर कामगार आयुक्त, नागपूर यांच्याकडे सर्व संबंधितांची बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत संबंधित कामगारांना कायदेशीर देणी देण्यासंदर्भात खाजगी वॉशरी ऑपरेटर्स व कामगार प्रतिनिधी यांच्यामध्ये संमजस्य करार झाला असून- सदर करारानुसार इच्छुक कामगारांना कायदेशीर देणी अदा करण्यात आलेली आहेत.

सदर बंद पडलेल्या खाजगी कोल वॉशरीज चालविण्याबातचा कोणताही प्रस्ताव महानिर्मिती कंपनीच्या विचाराधीन नाही.

---

**राज्यातील पांदण रस्त्यांची हजारो प्रकरणे ब-याच वर्षापासून न्यायालयात प्रलंबित असल्याबाबत**

**(६) १३५१९ (०४-०४-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पांदण रस्त्यांची हजारो प्रकरणे ब-याच वर्षापासून न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे, या प्रकरणाचा जलद निपटारा करण्यासाठी स्वतंत्र लवाद किंवा जिल्हास्तरीय छोटया न्यायालयाची संकल्पना नव्याने स्थापन झालेल्या राज्य शासनाअंतर्गत लवकर राबविण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवडयात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १४३ अन्वये मामलेदार ॲक्ट नुसार वहीवाटीसाठी रस्ते तयार करुन देण्याची तरतूद असतांनाही मागील शासनाने याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील पांदण रस्त्यांची प्रलंबीत प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी व वहीवाटीसाठी रस्ते तयार करण्यासंदर्भात कोणती प्रभावी योजना आखण्यात आली वा येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०९-२०१५) :** (१), (२), (३) व (४) सुवर्ण जयंती राजस्व अभियान राबविण्याचा निर्णय शासनाकडून दिनांक १८.७.२०१३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता. यातील कार्यपध्दतीस अनुसरुन गाव नकाशाप्रमाणे अतिक्रमीत व बंद झालेले गाडी रस्ते पाणंद/पांधन/पानधन/शेतरस्ते/शिवाररस्ते त्वरील मोकळे करण्याबाबत धडक मोहिम आखण्याच्या सूचना सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. तसेच मसहूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक करणे यासाठी सर्व जिल्ह्यामध्ये दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून “महाराजस्व अभियान” राबविण्याचा शासन निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये गाव नकाशाप्रमाण अतिक्रमीत व बंद झालेले गाडी रस्ते/पाणंद/पांधन/शेतरस्ते/शिवाररस्ते/शेतावर जाण्याचे पायमार्ग मोकळे करणे या कामांचाही समावेश करण्यात आला आहे.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील घिसाडी समाजाला पडीक जमिनीचा ७ /१२ उतारा, रेशनकार्ड व आधारकार्ड अद्यापी मिळाले नसल्याबाबत.**

**(७) १३७७१ (०४-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) या तालुक्यातील घिसाडी समाजाला पडीक जमिनीचा ७ /१२ उतारा, रेशनकार्ड व आधारकार्ड अद्यापी मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घिसाडी समाजाला रेशनकार्ड, आधारकार्ड तसेच पडीक जमिनीचा ७/१२ चा उतारा तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-१०-२०१५) :**(१) या संदर्भात अर्ज / निवेदन जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील यंत्रमाग लघुउद्योगाचे वीजदर इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक असल्याबाबत**

**(८) १५३२२ (१०-०४-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातील यंत्रमाग लघुउद्योगाचे वीजदर इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील यंत्रमाग लघुउद्योगांना वीजदर अनुदान देणेच बंद केले आहे , हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत व अनुदान चालू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. शासन निर्णयानुसार यंत्रमाग ग्राहकांना वीजदरात सवलत देणे सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हा, मावळ तालुक्यातील मंगरुळ गावातील शेतक-यांना जमीन, घराकडे जाण्यासाठी रस्ता नसल्याबाबत**

**(९) १५४४४ (०७-०४-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा, मावळ तालुक्यातील मंगरुळ गावातील शेतक-यांना जमीन, घराकडे जाण्यासाठी रस्ता नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्यासाठी मावळच्या तहसिलदारांकडे दिनांक १९ मे, २०१२ पासून अर्ज विनंत्या चालु आहेत. परंतू तहसिलदार कार्यालयाकडून आजपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासाठी तहसिलदारांकडे पाठपुरवा करुनही दखल घेतलेली नाही तसेच त्यांच्याकडे स्थळ पाहणीसाठी अनेकदा लेखी पत्र सुध्दा शेतक-यांना आली होती परंतु आजपर्यंत तहसिलदार जमीन पाहण्यासाठी आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतक-यांना त्यांच्या जमिनीकडे, घराकडे जाण्यासाठी रस्ता मिळणे बाबत शासन स्तरावर कोणता निर्णय झाला आहे काय, नसल्यास विलंबणाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-१०-२०१५) :** (१), (२) व (३) प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे रस्ता देण्याबाबत संबंधित तहसिलदार यांनी दि.२४/०६/२०१५ रोजी आदेश पारीत केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात औद्योगिक आणि घरगुती वीजग्राहकांसाठी वीज जोडणी घेताना होणा-या खर्चाबाबत

**(१०) १६१८४ (०८-०३-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात औद्योगिक आणि घरगुती वीजग्राहकांसाठी वीज जोडणी घेताना होणा-या खर्चाच्या पन्नास टक्के रक्कम परतावा महावितरण कंपनीकडून देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेती पंपासाठी लागणारे वीज जोडणी स्वखर्चाने पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतीपंपासाठी लागणा-या खर्चाच्या पन्नास टक्के रक्कमेचा परतावा देण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे,
(४) या संदर्भात कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. परंतु, जे कृषीपंपग्राहक स्वखुशीने वीजजोडणी घेऊ इच्छितात, त्यांना सदरची वीजजोडणी स्वखर्चाने घेण्याची सुविधा उपलब्ध आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या पशुसंवर्धन विभागात सरळसेवेने भरावयाची १८५८ पदे गेल्या कित्येक वर्षापासून रिक्त असल्याबाबत**

**(११) १७०६६ (१०-०८-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या पशुसंवर्धन विभागात सरळसेवेने भरावयाच्या ५ हजार २२० पदांपैकी तब्बल ११२५ पदे व पदोन्नतीने भरावयाच्या १६१९ पदापैकी ७३३ पदे अशा एकूण ६८३९ पदांपैकी १८५८ पदे गेल्या कित्येक वर्षापासून रिक्त असल्याची माहे मे, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने, त्याचा कामावर परिणाम होत असल्याने शेतक-यांना पशुवैद्यकीय डॉक्टरअभावी आपल्या पशुधनावर योग्य व तातडीने उपचार करता येत नसल्याने पशुधन गमाविण्याची वेळ येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पशुसंवर्धन विभागातील असलेली रिक्त पदांची भरती करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर कार्यवाही किती दिवसात पूर्ण करण्यात येईल,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

पशुसंवर्धन विभागात सरळसेवेने व पदोन्नतीने भरावयाच्या एकूण ६८४१ पदापैकी २१८८ पदे रिक्त आहेत. यात लिपिक वर्ग गट-क ची ६१९ पदे व ड वर्गीय कर्मचाऱ्यांची ७३२ अशा एकूण १३५१ पदांचाही समावेश आहे.

(२) एकूण २१८८ रिक्त पदामध्ये गट-अ ते गट-ड संवर्गाचा समावेश आहे. यामध्ये लिपीक वर्ग गट-क यांची ६१९ व ड वर्गीय कर्मचाऱ्यांची ७३२ अशी पदे रिक्त आहेत. तसेच या पदांना पशुधनावर उपचार करण्याकरीता ग्राह्य धरता येणार नाही.

शेतकऱ्यांच्या पशुधनावर केवळ सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुधन विकास अधिकारी गट-अ, पशुधन विकास अधिकारी गट-ब, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी या संवर्गाचेच अधिकारी उपचार करत असतात.

रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या दवाखान्यातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे सोपविण्यात आला असून शेतकऱ्यांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.

(३) रिक्त असलेली पदे भरण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही सुरु आहे :-

(१) सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन या संवर्गाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीत आहे.

(२) पशुधन विकास अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस पात्र ३०० उमेदवारांपैकी २९६ उमेदवारांना पदस्थापना देण्यात येत आहे. चार उमेदवारांनी ते नियुक्तीसाठी इच्छुक नसल्याचे कळविले आहे. त्यांचेऐवजी अन्य ४ उमेदवारांची मागणी केली आहे.

(३) गट-क संवर्गातील पशुधन पर्यवेक्षकांना सहाय्यक पशुधन विकास अधिकारी या पदावर पदोन्नती देणेबाबतची प्रक्रिया सुरु असून लवकरात लवकर पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

(४) पशुधन पर्यवेक्षकांची राज्यस्तरीय रिक्त असलेली २३९ पदाबाबत बिंदू नामावली तपासणी करुन घेण्याचे काम सुरु आहे.

(५) गट-ड संवर्गातील २६९ रिक्त पदे भरण्याबाबत दि.४/६/२०१५ रोजी जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रकिया पूर्ण झालेली आहे. लवकरच लेखी परिक्षेचा कार्यक्रम घोषित करण्यात येईल.

(४) वर नमूद क्र.३ व ४ व ५ बाबतची कार्यवाही पूर्ण होताच सदरील रिक्त पदे भरण्यात येती.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय महामार्ग क्र.११ तुळजापूर औरंगाबद रोड, चौपदीकरण करताना, संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(१२) १७०६७ (०६-०८-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्र.११ तुळजापूर औरंगाबद रोड, चौपदीकरण करताना, संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला देताना, वेगवेगळे दर देण्यात आल्याबाबतची तक्रार शेतकरी संघटना, उस्मानाबाद यांनी जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचेकडे दिनांक २३ मार्च, २०१५ च्या सुमरास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार तक्रारीच्या अनुषंगाने महामार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या मालकांना समानदर देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे.

तुळजापूर औरंगाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ असून सदर प्रश्नात महामार्ग क्र.११ दर्शविण्यात आला आहे.

(२) राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ च्या चौपदरीकरण करणेबाबत तामलवाडी ते येडशी येथील प्रकरणामध्ये निवाडे करताना संबंधित गावचे कलम ३(A) अधिसूचना प्रसिध्द तारखेच्या पूर्वीचे खरेदी विक्री व्यवहाराच्या दराचा व शिघ्र सिद गणकाच्या दराचा तसेच संबंधित जमिन

मालकांनी सादर केलेल्या पुराव्याचा विचार करुन संपादित क्षेत्राचे दर निश्चित करुन निवाडे घोषीत करण्यात आलेले आहेत. तरी ही मंजुर मोबदला बाबत बाधित खातेदारांचा आक्षेप असल्यास संबंधित बाधित खातेदार यांना राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील तरतुदी नुसार लवाद (Arbitrator) कडे दाद मागण्याची तरतुद आहे त्यामुळे स्वतंत्रपणे चौकशी करण्याचा प्रश्न येत नाही.

(३) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील कलम ३ (G) नुसार जमिनीची किंमत (बाजारमुल्य) ठरविताना संबंधित गावामधील ३(A) ची अधिसुचना प्रसिध्दी दिनांकापूर्वीचे मागील तीन वर्षाचे खरेदी विक्री झालेले व्यवहार व संबंधीत गावाचे शिघ्र सिध्द गणकाच्या दरांचा विचार करुन जे जास्त दर आहेत, त्या प्रमाणे जमिन मालकांना संपादित जमिनीची किंमत देण्यात आलेली आहे. संपादित जमिनीस प्रत्येक गावातील खरेदी विक्री व्यवहाराचे व शिघ्र सिध्द गणकाचे दर हे असल्याने त्या आधारे बाजार मुल्य दर ठरविण्यात आलेले आहेत. राष्ट्रीय मुल्य दर ठरविण्यात आलेले आहेत. राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३ (G) नुसार बाजारमुल्य दर ठरविण्याचे तरतुदीनुसार बाजारमुल्य दर निश्चित केलेले असल्याने समान दर देण्याबाबत वेगळ्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही .

(४) निवाडा जाहीर झाल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या संपादन संस्थेकडून निधी प्राप्त होताच मावेजा वितरणाची कार्यवाही करण्यात येत असल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**वैरागड (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील वीज वाहिनीसाठी उभारलेल्या टॉवरमध्ये गेलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(१३) १७३०५ (१०-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैरागड (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील राजाभाऊ सुगदेव गव्हाणे शेतकऱ्यांने उच्च दाबाच्या वीज वाहिनीसाठी उभारलेल्या टॉवरमध्ये गेलेल्या जमिनीचा व टॉवर उभारतांना झालेल्या नुकसानीच्या उर्वरित मोबदला देण्यास संबंधित वीज कंपनीकडून टाळाटाळ होत असून काही रक्कमेचा दिलेला धनादेशही वटला नसल्याचे माहे मे, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याबाबत संबंधित कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) श्री.राजाभाऊ सुगदेव गव्हाणे व त्यांचा भाऊ श्री.भारत सुगदेव गव्हाणे यांना महाराष्ट्र ईस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनीकडून मोबदल्याची रक्कम व नुकसान भरपाईची रक्कम नियमानुसार देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दाभोळ वीज प्रकल्पाच्या महाराष्ट्राकडे असलेल्या थकबाकीचे रुपांतर थकीत कर्जाऐवजी समभागात करण्यास सरकारने परवानगी दिल्याबाबत**

**(१४) १७५१५ (०६-०८-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नैसर्गिक वायुअभावी बंद पडलेल्या दाभोळच्या रत्नागिरी गॅस अँड पॉवर प्रा.लि. (आरजीपीपीएल) वीज प्रकल्पच्या महाराष्ट्राकडे असलेल्या थकबाकीचे रुपांतर थकीत कर्जाऐवजी समभागात करण्यास सरकारने परवानगी दिली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे दाभोळ प्रकल्प खासगीकरणासाठी खुल्ला झाल्याने राष्ट्रीय मालमत्ता असलेला हा प्रकल्प भविष्यात खासगी कंपनीच्या हातात जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दाभोळ प्रकल्पाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ,

(४) असल्यास, चौकशीअंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०९-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे, कर्जदारांचे आरजीपीएल कंपनीवर असलेल्या कर्जाच्या थकबाकीचे समभागात रुपांतरीत करण्यास, राज्य शासनाच्या या कंपनीतील सहभागाच्या अनुषंगाने मान्यता दर्शविली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जैतापुर अणुऊर्जा प्रकल्पाचे रेंगाळलेले भुसंपादनाचे काम मार्गी लावून जमीनीचा ताबा न्युक्लिअर पॉवर कॉर्पो.ऑफ इंडिया या कंपनीला देण्याबाबत**

**(१५) १८२२७ (१६-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जैतापुर अणुऊर्जा प्रकल्पाला विरोध करण्यासाठी दि.२४ मे २०१५ रोजी एका राजकीय पक्षाच्या लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांनी प्रकल्पस्थळी हल्ला करुन प्रकल्पाचे काम बंद पाडले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी रेंगाळलेले भुसंपादनाचे काम मार्गी लावून जमीनीचा ताबा न्युक्लिअर पॉवर कॉर्पो.ऑफ इंडिया या कंपनीला देण्यासाठी शासनामार्फत चौकशी करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, चौकशीअंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही. परंतु दिनांक २४.०५.२०१५ रोजी रात्रौ ८.०५ वा. लोकप्रतिनिधी व इतर कार्यकर्ते सदर प्रकल्पाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ आले होते.

(२) सदर प्रकल्पासाठी भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाली असून जमिनीचा ताबा न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.यांना दिनांक २२.०१.२०१० रोजी देण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वीजपुरवठा उपलब्ध नसलेल्या शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या योजनेंतर्गत ५ टक्के रक्कम भरुन सौर कृषी पंप उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१६) १९२६९ (१०-०८-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीजपुरवठा उपलब्ध नसलेल्या शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या योजने अंतर्गत ५ टक्के रक्कम भरुन सौर कृषीपंप उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठी राज्य शासनाला ४५० कोटी रुपयांची तरतूद करावी लागणार आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्हयातील महावितरणकडे पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ग्राहकांना या योजनेच्या लाभ देण्याबाबत व योजना तातडीने सुरु करण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०९-२०१५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्र.सौरप्र-२०१४/ प्र.क्र.२१९/ऊर्जा-७, दि.२७.३.२०१५ अन्वये केंद्र शासनाच्या योजनेनुसार महाराष्ट्र राज्यात एकूण ७५४० सौर कृषिपंपाचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही. सदर योजनेंतर्गत ७५४० सौर कृषिपंपासाठी एकूण अंदाजित रक्कम रु.४४५.०१ कोटी खर्च अपेक्षित असून त्यापैकी ५ टक्के म्हणजे अंदाजे रु. २२.२५ कोटी इतक्या रुपयांची तरतुद करावी लागणार आहे.
(३) सदर योजनेंतर्गत ७५४० सौर कृषीपंप बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या आतमहत्याग्रस्त शेतकरी जिल्ह्यामध्ये बसविण्यात येणार आहेत. सदर योजना पथदर्शी स्वरुपात असून, तिच्या यशस्वीतेनंतर यथावकाश राज्यभर राबविली जाणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हा परिषदमधील वर्ग-१, वर्ग-२ च्या पशुधन विकास अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१७) १९६०६ (०६-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हा परिषदमधील वर्ग-१, वर्ग-२ च्या पशुधन विकास अधिकाऱ्यांची २१ पदे गेली काही वर्षापासून रिक्त असून सदर रिक्त पदांमुळे पशुधन विकास अधिकारी उपलब्ध न झाल्याने जनावराच्या मृत्यूमूखी पडण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्सास, सदर पदे तात्काळ भरण्याबाबत दि १६/१२/२०१४ रोजी व त्यानंतर अनेक वेळा लोकप्रतिनिधीनी मा.महसूल मंत्री यांना पत्रव्यवहार करुनही अदयापी शासनाकडून कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार, रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.
अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे जनावरांच्या मृत्युमूखी पडण्याच्या प्रमाणात वाढ झालेली नाही. कारण रिक्त असलेल्या पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक पशुधन विकास अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आला असून, पशुपालकांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.
(२) हे खरे नाही.
पशुधन विकास अधिकाऱ्यांची रिक्त असलेली पदे भरण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून एकूण ३०० शिफारस पात्र उमेदवारांपैकी साक्षांकन नमूना प्राप्त २९६ उमेदवारांची वैद्यकीय तपासणी, चारित्र्य पडताळणी इ. कागदपत्रांची प्रक्रिया सुरु

आहे. वैद्यकीय तपासणी व पूर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रे प्राप्त झालेल्या १४२ उमेदवारांना पदस्थापना दिली असून उर्वरित उमेदवारांना पदस्थापना देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे न्हावे, (ता.उरण, जि.रायगड) येथील काही**
**जमिनीबाबतच्या निवाड्यातील २१५ प्रकरणांबाबत**

**(१८) १९८१७ (०६-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे न्हावे, (ता.उरण, जि.रायगड) येथील काही जमिनीबाबत निवाडा क्र.२/९४ दि.२७.२.२००४ या निवाड्यातील २१५ प्रकरणांची मालकी कोणाची आहे याबाबत अभिप्राय देण्याची मागणी शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, यांनी दि.२७.४.२०१५ रोजीच्या सुमारास विभागीय आयुक्त. कोकण विभाग, नवी मुंबई यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनावर शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-१०-२०१५) :** (१) होय.

(२) होय, मौजे न्हावे, ता.पनवेल येथील भूसंपादन निवाडा क्र.२/१९९४ मधील सर महम्मद युसुफ ट्रस्ट यांच्या संपादित जमिनीसंबंधीचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने, सदर निवाड्यातील उर्वरीत खातेदारांना संपादित जमिनीसंबंधी १२.५ % योजनेंतर्गत भूखंड वाटपासंबंधी सिडकोमार्फत नियमानुसार निर्णय घेण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग कार्यालयाने दि.२३.७.२०१५ च्या पत्रान्वये व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अवैध वाळू उत्खनान बंद होण्यासाठी**
**शासनाने वाळू धोरण जाहीर केले असल्याबाबत**

**(१९) २०२९९ (१०-०८-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अवैध वाळू उत्खनाला चाप लावण्यासाठी राज्य शासनाने वाळू धोरण जाहीर केले असल्याचे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरणामध्ये वाळू माफियांविरोधात कायदेशीर कारवाईचा समावेश करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, या धोरणाची अंमलबजावणी करण्याकरिता शासनामार्फत निर्णय घेण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-१०-२०१५) :** (१),(२) व (३) मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पश्चिम विभाग, खंडपीठ पुणे यांनी सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती उत्खननासंदर्भात धोरण निश्चित करण्याची आवश्यकता विशद केली होती. त्यानुसार शासनाने यासंबंधीचे धोरण, शासन निर्णय दि.२१ मे, २०१५ अन्वये विहित केले आहे. सदर धोरणातील तरतुदींनुसार सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती उत्खननासंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे. सदर धोरणामध्ये वाळूच्या अवैध उत्खनन/वाहतूकीबाबत कारवाई करण्याचीही तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्रात नवीन भूसंपादन कायद्यानुसार संपादित जमिनीच्या मोबदल्याचे नियम करणेबाबत

**(२०) २०४५८ (१०-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्याचा सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी सिंचन प्रकल्पांची कामे मंजूर असून त्याकरिता होणा-या जमिन संपादणुकी संदर्भात नवीन भुसंपादन कायद्यानुसार संपादित जमिनीच्या ४ पट मोबदल्याचे नवीन नियम तातडीने करण्याबाबत स्थानिक आमदार अचलपुर यांनी दिनांक २८ मे, २०१५ रोजी मा.महसूल मंत्री, याच्याकडे पत्र देवून मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे,

परंतु मा.मंत्री (महसूल) यांचे कार्यालयास सदर पत्र दिनांक २१.७.२०१५ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.

(२) गुणांकाबाबत सुधारित अधिसूचना दिनांक २६ मे, २०१५ रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे व दिनांक ३१ ऑगस्ट,२०१५ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक आमदार

(अचलपूर) यांना अवगत करण्यात आले असून, सदर पत्रासोबत दिनांक २६ मे,२०१५ रोजीच्या अधिसूचनेची प्रत पाठविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत तालुक्यात (जि.रायगड) येथे पशुवैद्यकीय अधिकारी दवाखान्यात उपस्थित राहत नसल्याबाबत**

**(२१) २०९८० (०६-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत तालुक्यात (जि.रायगड) येथे पशुवैद्यकीय अधिकारी दवाखान्यात उपस्थित राहत नसल्याचे माहे मार्च २०१५ च्या दुस-या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी दवाखान्यात उपस्थित राहून जनावरांना उपचार करणेबाबत शासनाने पशुवैदयकिय अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.
मार्च २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहत कर्जत तालुक्यात कार्यशिबिरे आयोजित केल्याने व सदर शिबिरांमध्ये शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने प्रशिक्षण घेणे क्रमप्राप्त असल्याने कर्जत तालुक्यातील काही पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवक्षेक व इतर कर्मचारी पशवैद्यकीय दवाखान्यांमध्ये उपस्थित न राहता आयोजित केलेल्या कार्यशिबिरांमध्ये गटा गटाने उपस्थित राहिले आहेत. मात्र ते पशुवैद्यकीय दवाखान्यात उपस्थित राहत नाहीत. ही बाब सत्य नसून अशा प्रकारची कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) व (३) कर्जत तालुक्यतील पशवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी मार्च, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात आयोजित केलेल्या कार्यशिबिरात उपस्थित राहिल्याने चौकशी करणे व कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पशू खाद्य म्हणुन वापरात येणा-या सोयाबीन कुटारातील ऑक्झॅलिक ॲसीड जनजागरण मोहिमेबाबत**

**(२२) २१०९९ (१०-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम वऱ्हाडत सोयाबीन कुटारातील ऑक्झॉलिक ॲसीडमुळे जनावरांवर होणा-या दुष्परिणामाचा अनुषंगाने व्यापक जन जागरण मोहिम हाती घेण्यात येईल, असे शासनाचे

दिनांक ६ एप्रिल, २०१५ रोजी लक्षवेधी च्या अनुषंगाने शासनाने जाहीर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत काय उपाय योजना करण्यात आल्या,

(३) असल्यास, त्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सोयाबीन कुटारातील ऑक्झॅलिक ॲसीडचे प्रमाण कमी करुन, त्याची पौष्टिकता वाढविण्यासाठी सोयाबीन कूटारावर चुन्याच्या निवळीची प्रक्रिया करण्याची प्रात्यक्षिके पशुसंवर्धन विभागामार्फत आयोजित करण्यात येतात. कामधेनू दत्तक ग्राम या जिल्हास्तरीय योजनेंतर्गत सन २०१२-१३ ते २०१४ -१५ या ३ वर्षात एकुण ५,१४१ प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे. सन २०१५-१६ या वर्षातही २९१ प्रात्यक्षिकांचे आयोजन करणे प्रस्तावित आहे.

(३) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात कामधेनु दत्तक ग्राम योजनेंतर्गत २९१ या प्रात्यक्षिकांकरीता प्रति प्रात्यक्षिक रु. ५,०००/- या प्रमाणे एकूण रु. १४.५५ लक्ष निधीची तरतुद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उरण (ता.जि.रायगड) येथील कारंजा व परिसरातील गावांमध्ये सिडको, जेएनपीटी आणि ओएनजीसी यांनी पर्यावरणाचा ऱ्हास केला असल्याबाबत**

**(२३) २१३३९ (१०-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (ता.जि.रायगड) येथील कारंजा व परिसरातील गावांमध्ये मागील ३ वर्षात सिडको, जेएनपीटी आणि ओएनजीसी यांनी पर्यावरणाचा ऱ्हास केला असल्याने तेथील पारंपारिक मच्छिमारांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार संबंधितांना १ हजार ६३० मच्छिमार कुटुंबाना एकूण ९५ कोटी १९ लाख २० हजार रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने मच्छिमार कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार जिल्हाधिकारी, रायगड यांचेस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिगांव पाटबंधारे प्रकल्प (जि.बुलढाणा) बांधात पुर्णा नदीवरील पुलांचे पोचमार्गाचे भुसंपादन करण्याबाबत**

**(२४) २१६५७ (०६-०८-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिगांव पाटबंधारे प्रकल्प बांधात पुलांचे पोच मार्गासाठी आवश्यक भास्तन, कठोरा, कालवड, माटरगांव, हिंगणा भोटा, भेंडवळ बु., भेंडवळ खु., निभोरा खु., गाडेगांव बु., माऊली, टाकळी पारस्कर, झाडेगांव, मानेगांव, खिरोडा या गावांतील भुसंपादनाचे प्रस्ताव सन २००९-१० मध्ये जिल्हाधिकारी बुलडाणा यांना सां.बा.विभाग खामगांव, यांनी सादर केलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरण अंतिम निवाडा स्तरावर आहे, हे खरे आहे काय?

(३) असल्यास, उपरोक्त गावातील आवश्यक जमिनीचे भुसंपादनाची कार्यवाही केंव्हा पुर्ण होणार आहे?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) एकूण १६ प्रकरणांपैकी०१ प्रकरणात ताबा दिलेला आहे. ०२ प्रकरणे अंतीम निवाडास्तरावर आहेत व १३ प्रकरणे प्रारुप निवाडा स्तरावर आहेत.

(३) बहुतांश प्रकरणे अंतीम निवाडास्तरावर व प्रारुप निवाडास्तरावर आहेत. प्रकरणात निधी मागणी करुन सर्व प्रकरणे लवकरांत लवकर निकाली काढली जातील. नियमान्वये प्रकरणांचा तीन वर्षाचा कालावधी अद्याप बाकी आहे.

(४) प्रकरणात विलंब झालेला नाही.

---

**अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासी वाडयावरील विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी देण्याबाबत**

**(२५) २१७३८ (०६-०८-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील सांबरकुंड मध्यम प्रकल्पासाठी भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ४ अन्वये भूसंपादनाबाब दिनांक १-४-२००६ रोजी नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग तालुक्यातील मौजे खेरवाडी, जांभुळवाडी, सांबरकुंड इत्यादी संपादित करण्यात येणाऱ्या शेत जमिनी, वरकस जमिनी व वन हक्क कायद्यानुसार मिळालेल्या जमिनी संपादित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी वाडयातील प्रकल्पग्रस्त विस्थापित होत असून त्यांच्या उदरनिर्वाहासाठी असलेल्या जमिनी संपादित होत असल्याने आदिवासी वाडयांवरील प्रकल्पग्रस्त बेघर होणार आहेत , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासी वाडयावरील विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०९-२०१५) :** (१) होय, अंशत: खरे आहे, सांबरकुंड प्रकल्पाच्या धरण व बुडीत क्षेत्र संपादनाकरिता प्रकरण ५७० अन्वये १०३.८१.२. हे. क्षेत्राचा भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयाकडे सादर करण्यात आला असून सदर प्रकरणी भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ४ ची अधिसूचना दिनांक २५.१.२००८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर प्रकरणी अंतिम निवाडा दिनांक १७.९.२०११ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, धरणाच्या बुडीत क्षेत्रात ज्या वाड्यांच्या जमिनी व घरे जाणार आहेत व जे प्रकल्पबाधित होणार आहेत त्यांचे पुनर्वसन करावे लागणार आहे.

(४) होय, विस्थापित होणाऱ्या प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन त्यांच्या पसंतीने निवडलेल्या ठिकाणी करण्यासाठी मौजे राजेवाडी (रामराज, ता.अलिबाग) येथील सर्व्हे नं. ११२ मधील २८-००-०० हे. इतक्या खाजगी क्षेत्राच्या संपादनाची कार्यवाही संपादक संस्थेच्या स्तरावर प्रगतीत आहे असे कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता.पेण, जि.रायगड यांनी जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयास कळविले आहे. प्रस्ताव प्राप्त होताच जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयाकडून नवीन भूसंपादन कायद्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पाटण तालुक्यातील पवनचक्की प्रकल्पामुळे खराब झालेल्या रस्त्यांना निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(२६) २१८६७ (०६-०८-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण तालुक्यात मोठया प्रमाणात उभारण्यात येणा-या पवनऊर्जा प्रकल्पातील कंपन्यानी प्रकल्पाकरीता लागणा-या अवझड साहित्यांची वाहतूक तालुक्यातील जिल्हा परीषदेच्या व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावरुन नेल्याने सदरचे रस्त्यांचे सुमारे २५ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील प्रमुख रस्त्यांची दुरावस्था करुन संबंधित कंपन्यानी नुकसान भरपाई म्हणून जिल्हा परिषद, सातारा यांचेकडे केवळ ३० लाख रुपये नुकसानीची अनामत रक्कम जमा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंपन्यानी केलेला वापरामूळे, नुकसान झालेल्या रस्त्यांची लांबी, व नुकसानीचे अदांजपत्रक याचा विचार करुन खराब झालेले रस्ते पुर्वरत करण्याकरीता राज्य शासन कोणता निर्णय घेणार आहे, वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०९-२०१५) :**(१) होय.
(२) होय., सन २००७/०८ मध्ये पवनऊर्जा कंपन्यांनी जिल्हा परिषद सातारा यांचेकडे नुकसान भरपाई म्हणून रु.२६.२५ लक्ष एवढी रक्कम जमा केली आहे.
(३) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) यांच्या मार्फत पाटण तालुक्यातील रक्कम रु. १४५३.०० लक्ष इतक्या वावाच्या ४ रस्त्यांच्या कामांना सन १४-१५ मध्ये मंजुरी देण्यात आली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदरील कामे सुरु आहेत.

अन्य २३ रस्ते देखील अवजड वाहतुकीमुळे खराब झाले आहेत व त्यांची दुरुस्ती करण्यासाठी जिल्हापरिषदेमार्फत पाठपुरावा सुरु आहे. या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पवन ऊर्जा प्रकल्प रस्ते दुरुस्ती समितीच्या शिफारशी नुसार सदर रस्ते दुरुस्ती विषयी पुढील कार्यवाही प्रस्तावति आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### खापरखेडा (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथील औष्णिक विद्‌युत कोंद्राची राखेची पाईपलाईन जमिनीवरुन न टाकता अंडरग्राऊंड टाकण्याबाबत

**(२७) २२३८४ (१०-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा गरंडा, प.ह.नं.२०, (पारशिवनी, जि.नागपूर) येथील खापरखेडा औ.वि.कोंद्राची राखेची पाईपलाईन जात असल्याने शेतक-यांच्या ७/१२ वरील आराजी कमी होत असल्याने सदर पाईप लईन जमिनीवरुन न टाकता जमिनीखालून टाकण्याबाबतची योग्य ती कार्यवाही करण्याबाबत मुख्य अभियंता, खापरखेडा औष्णिक विद्‌युत केंद्र, खापरखेडा, जि.नागपूर यांना दिनांक १९ मे, २०१५ रोजीच्या पत्रान्वये पालकमंत्री, नागपूर जिल्हा यांनी आदेश दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आदेशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०९-२०१५)** :(१) हे खरे आहे.

(२) औष्णिक विद्युत केंद्राची राख वाहून नेणाऱ्या पाईपलाईनची सतत देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असल्यामुळे त्या पाईप लाईन जमिनीवरुनच टाकणे गरजेचे असते. त्यामुळे सदर पाईपलाईन जमिनीखालून टाकणे तांत्रिकदृष्या उचित होणार नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**सातपाटी (जि.पालघर) येथील मासळी लिलावगृहाचे**
**बांधकाम अपूर्ण असल्याबाबत**

**(२८) २२९२४ (१०-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपाटी (जि.पालघर) येथे दिड कोटी रुपये खर्च करुन उभारण्यात येणा-या मासळी लिलावगृहाचे बांधकाम सन २०१२ रोजी सुरु होऊनही अद्यापी पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मासळी लिलावगृहाचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याने मासळीचा लिलाव उघडयावरच होत असल्याने सातपाटी परिसरात दुर्गंधी व साथीचे रोगाची लागण नागरिकांना होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मासळी लिलावगृहाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५)** :(१) होय.

(२) नाही, सद्य:स्थितीत सातपाटी येथे मासळीचा लिलाव प्रचलित ठिकाणी सालाबाद प्रमाणे होत आहे.

(३) व (४) स्थानिक मच्छिमार संस्थांच्या प्रतिनिधींनी लिलावगृहाच्या बांधकामांची आवश्यकता नसल्याबाबत सांगितल्याने काम सुरु केले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मच्छीमारी नौका कलरकोड केल्याशिवाय डिझेल परतावा वाटप**
**करणार नाही असा आदेश शासनाने काढल्याबाबत**

**(२९) २२९५९ (१०-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मच्छीमारी नौका कलरकोड केल्याशिवाय डिझेल परतावा वाटप करणार नाही असा आदेश शासनाने नुकताच माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यातील १ हजार ७५० पैकी ६० टक्के मच्छिमारांनी नौकांना कलरकोड केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्ह्यातील किती कलरकोड मच्छिमारी नौका डिझेल परताव्याकरिता प्रलंबित आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५)** :(१) होय.
(२) होय.
(३) रत्नागिरी-१६६ व रायगड-४४ मच्छिमार नौका अशा एकूण २०० मच्छिमार नौका कलरकोड न केल्यामुळे डिझेल परताव्याकरिता प्रलंबित आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्हयातील जिल्हापरिषद व राज्य स्तरावर रुग्णालयातील पशुधन विकास अधिकाऱ्याची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३०) २२९९७ (०६-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्हयातील नऊ लाखांच्या जवळपास पशुधनाच्या आरोग्याची देखभाल करण्यासाठी जिल्हापरिषदच्या १०४ मंजूर पदांपैकी पशुधन विकास अधिकाऱ्याची ४८ पदे व राज्य स्तरावर रुग्णालयासाठी २५ पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या पदांपैकी ५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे पशुवैद्यकीय सेवेवर याचा विपरीत परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जनावरांना उद्भवणाऱ्या आजारांवर उपचार करण्यासाठी रिक्त पदे भरण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०९-२०१५) :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.
स्थानिकस्तर-जिल्हा परिषद स्तरावर १०४ मंजूर पदांपैकी ५२ पदे भरण्यात आली असून ५२ रिक्त आहेत.
तथापि राज्य स्तरावर २५ पशुधन विकास अधिकाऱ्यांची मंजूर पदे नसून ११ मंजूर पदे आहेत. त्यापैकी १० पदे भरण्यात आलेली असून १ पद रिक्त आहे.
(२) हे खरे नाही.
रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक यांच्याकडे सोपविण्यात आला असून पशुपालकांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त झालेल्या उमेदवारांपैकी ३१ पशुधन विकास अधिकाऱ्यांची नियुक्ती जळगांव जिल्ह्यात करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील रत्नागिरी व रायगड जिल्हयातील**
**मच्छिमारांच्या समस्या सोडविण्याबाबत**

**(३१) २३०२९ (०६-०८-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील रत्नागिरी, रायगड जिल्हयातील मच्छिमारांच्या समस्या सोडविण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाचे संबंधित अधिकारी, मच्छिमार सोसायटयांचे पदाधिकारी यांचेसोबत मा.मत्स्यव्यवसाय विकास मंत्री यांच्या समवेत बैठक आयोजित करण्याची विनंती भांडूप (प), मुंबई येथील लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दिनांक २२/०१/२०१५ रोजीच्या निवेदनाव्दारे मा.मत्स्यव्यवसाय विकास मंत्री यांचेकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०९-२०१५) :** (१) होय.

(२) निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक १७.३.२०१५ रोजी विधान भवन येथे मा.मंत्री, मत्स्यव्यवसाय यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित लोकप्रतिनिधी यांचे समवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत निवेदनातील सर्व मुद्यांवर सर्वंकष चर्चा करुन लोकप्रतिनिधींना शासनाची भुमिका स्पष्ट करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हा भुमि अभिलेख कार्यालयातील रिक्त पदांबाबत**

**(३२) २३८२३ (०६-०८-२०१५). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयासाठी भूमिअभिलेख विभागास गट अ ते गट ड पर्यंतची एकूण ३१२ पदे मंजुर आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३१२ मंजूर पदापैकी २४८ पदांवरच सध्या कर्मचारी व अधिकारी कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, भुमिअभिलेख अधिक्षक ते शिपाई पर्यतची ६४ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सोलापूर जिल्हयाला मंजूर १२ उपअधिक्षकांपैकी केवळ सहा ठिकाणीच अधिकारी कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) सोलापूर जिल्ह्यात भूमि अभिलेख विभागाची गट-अ ते गट-ड संवर्गातील एकूण ३११ पदे मंजूर आहेत. त्यापैकी २३८ पदांवर अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून, सध्या एकुण ७३ पदे रिक्त आहेत. सोलापूर जिल्ह्यात उप अधिक्षक भूमि अभिलेख संवर्गातील १२ मंजूर पदांपैकी ४ पदांवर नियमित अधिकारी कार्यरत आहेत. पुणे विभागातील रिक्तपदे सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

---

## राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने मेरिटाईम बोर्ड आणि मत्स्य विभागाने पर्ससीन नेटद्वारे मासेमारी करण्यास परवानगी देऊ नयेत असे आदेश दिल्याबाबत

**(३३) २३८८८ (१०-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या पुणे खंडपीठात सिंधुदुर्ग जिल्हा समजीवी रापन मच्छिमार संघाने दाखल केलेल्या पर्यावरणहित यांचिकेवर हरित न्यायाधिकरणाच्या न्यायमुर्तीने मेरिटाईम बोर्ड आणि मत्स्य विभागाने पर्ससीन नेटद्वारे मासेमारी करणाऱ्या बोटधारक व स्टॉलधारकाला मासेमारी करण्यास परवानगी देऊ नयेत असे आदेश नुकतेच दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्ससनी नेटमुळे पारंपारीक पध्दतीने मासेमारी करणाऱ्या ३५ हजार मच्छिमारांवरील ओढवलले आर्थिक संकट दुर व्हावे तसेच समुद्रातील खारफूटी झाडांची नासधुस होऊ नये व मत्स्यबीज आणि मत्स्य जीवन यांचा ऱ्हास होऊ नये यासाठी न्यायाधिकाराने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने आतापर्यंत काय कार्यवाही करण्यात आली आहे,वा येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :** (१) होय.

(२) न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशाचे अगोदर शासनाने दिनांक ८.८.२०१२ पासून नौकांना पर्ससीन परवाने देणे बंद करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील दुध डेअरीतील दुधाचे वितरण बंद झाले असल्याबाबत

**(३४) २३८९२ (१०-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यात १९६८ मध्ये कारखाना अधिनियमाखाली स्थापन झालेली व १९९५ मध्ये ४.५ कोटी रुपये खर्च करुन अद्ययावत केलेली कणकवलीतील शासकीय दुध डेअरीतील दुध संकलन आणि आरे नावाच्या ब्रॅडखाली केल्या जाणाऱ्या दुधाचे वितरण बंद झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंद पडलेल्या डेअरीत गोकुळ या खाजगी दुध संघाचे दुध संकलन करुन शीतकरणासाठी ठेवण्यात येते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय दुध डेअरीतील कर्मचाऱ्यांच्याही दुसरीकडे बदल्या करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर दुध डेअरी बंद पडल्याची कारणे काय आहेत व ती पुन्हा सुरु करण्यसाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात येत आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :** (१) होय, दि.७.७.२०१३ पासून कणकवली (जि.सिंधुदुर्ग) येथील शासकीय दूध योजनेतील दूध संकलन व वितरण बंद आहे.

(२) दि.२३.९.२००२ च्या शासन निर्णया नुसार प्रति लिटर ०.३५ पैसे शितकरण खर्च आकारणी करुन गोकुळ संघास दि.१६.४.२०१३ पासून दि.६.४.२०१५ या कालावधीत दूध थंड करुन परत संघास देण्यात येत होते. तथापि, दि.७.४.२०१५ पासून गोकुळ संघाने दूध थंड करुन घेणे बंद केलेले आहे.

(३) होय.

(४) गोकुळ संघामार्फत सिंधुदुर्ग जिल्ह्यात दूध संकलन सुरु असल्याने व गोकुळ संघ शासन दरापेक्षा जास्त खरेदी दर देत असल्याने सहकारी संस्था गोकुळ संघास दूध पुरवठा करत आहे. त्यामुळे शासकीय दूध योजनेकडे होणाऱ्या दूधाचे संकलन कमी झाल्याने कणकवली येथे दूध संकलन बंद आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यात दुग्ध प्रकल्प दापचरी आवारात शेतकऱ्यांच्या बैलांना तेथील कर्मचाऱ्यांनी अन्नातून विषारी औषध दिल्याबाबत

**(३५) २३९९५ (०६-०८-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यात दुग्ध प्रकल्प दापचरी आवारात शेतकऱ्यांच्या बैलांना तेथील

कर्मचारी यांनी अन्नातून विषारी औषध दिल्यामुळे ७ बैल मृत झाल्याची घटना दि. ९ मे, २०१५ रोजी निदर्शनास आली आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी असणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) तसेच मृत पावलेल्या बैलाच्या मालकांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

अशा प्रकारची कोणतीही घटना दुग्धप्रकल्प दापचरी या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात घडलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बईतील आरे दुध केंद्रावरुन आरेच्या दुधाची व पदार्थाची विक्री न करता खाजगी कंपन्यांच्या पदार्थाची मोठया प्रमाणात विक्री केली जात असल्याबाबत**

**(३६) २४०३५ (०६-०८-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे दुध केंद्रावरुन आरेच्या दुधाची विक्री व आरे निर्मित दुग्धजन्य पदार्थ विक्री न करता खाजगी कंपन्यांच्या पदार्थाची मोठया प्रमाणात विक्री केली जात असल्याने अशा स्टॉलधारकांविरुध्द कारवाई करुन ते स्टॉल त्वरीत बंद करण्याचा निर्णय मा.दुग्ध विकास मंत्री यांनी दि. २५ मे २०१५ रोजी वा त्यासुमारास मंत्रालयातील त्यांच्या दालनात झालेल्या बैठकीत घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच बैठकीत सरकारने ठरवून दिलेल्या दराने शेतकऱ्यांकडून दुध खरेदी करणार नाहीत त्या दुध संघ संचालक मंडळावर कारवाई करुन ते बरखास्त करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने आतापर्यंत मुंबईतील १६०० आरे दुध विक्रीच्या स्टॉल धारकांवर काय कारवाई केली व किती स्टॉल दुग्धविकास आयुक्तांने ताब्यात घेऊन बंद केले आहेत वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

शासनाने पत्र क्र.एमएलके-२०१५/प्र.क्र.७२/पदुम-८, दि.१०.७.२०१५ नुसार निर्णय घेण्यात आला आहे.

(३) बृहन्मुंबई दूध योजने अंतर्गत आरे, वरळी व कुर्ला या दुग्धशाळांच्या अखत्यारीतील जे आरे दूध केंद्र चालक शासनाने दूध विक्री करीत नाही त्यासर्व दूध केंद्रचालकांना नोटीसा देण्यात आल्या. तदनंतर जे केंद्रचालक दूध विक्री करीत नाही किंवा केंद्र बंद ठेवण्यात आलेली आहेत. अशा एकूण १६४ दूध केंद्राचा पंचनामा करुन सिल करण्यात आले. त्यापैकी ६४ दूध केंद्रचालकांकडून कार्यवाही म्हणून दूध केंद्रांची अनामत रक्कम जप्त करुन शासनाकडे जमा करुन घेण्यात आली व सदर दूध केंद्रे पुन्हा चालू करण्यात आलीत. उर्वरीत सर्व दूध केंद्रावर कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोदिंया व गडचिरोली जिल्हयात पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पदे रिक्त असल्याबाबत

**(३७) २४०९२ (०६-०८-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदिंया व गडचिरोली जिल्हयात पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे रिक्त असल्यामुळे येथील जनतेला खाजगी सेवा घ्यावी लागत असल्यामुळे येथील पदे त्वरीत भरणे गरजेचे आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या धोरणानुसार सदर जागा नक्षलग्रस्त असल्यामुळे येथील रिक्त पदावर तातडीने अंमलबजावणी करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने रिक्त पदे भरण्यासाठी कायवाही करणार आहे काय,

(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-१०-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

गोंदिया व गडचिरोली जिल्हयातील रिक्त पदांचा पदभार कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचेकडे अतिरिक्त कार्यभार देऊन पशुपालकांना नियमित सेवा पुरविण्यात येत असून तेथील जनतेला खाजगी सेवा घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तसेच पशुधन विकास अधिकारी गट-अ या पदावरील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त पशुधन विकास अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

(२) होय, पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पशुधन विकास अधिकारी गट-अ पदाकरीता ३०० उमेदवारांची गुणवत्ता यादी प्राप्त झाली असून त्यापैकी २९६ साक्षांकन नमुने प्राप्त

उमेदवारांची वैद्यकीय तपासणी, चारित्र्य पडताळणी व इतर कागदपत्रांची पडताळणी करुन घेण्यात येत आहे. त्यापैकी वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रे प्राप्त झालेल्या १४२ उमेदवारांना पदस्थापना देण्यात आली असून उर्वरीत उमेदवारांना पदस्थापना देण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिठमुंबरी-तारामुंबरी (ता.देवगड,जि.सिंधुदुर्ग) खाडीमध्ये गाळ साचलेला असल्याबाबत**

**(३८) २४५३२ (०६-०८-२०१५). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिठमुंबरी-तारामुंबरी (ता.देवगड,जि.सिंधुदुर्ग) खाडीमध्ये गाळ साचलेला आहे ही वस्तुस्थिती शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर मच्छीमारांच्या मागणीनुसार तारामुंबरी गाळ काढण्याचे काम,व मच्छिमारांचे हित व अडचण लक्षात घेवून राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेली आहे असे कृषी व पदुम विभागाच्या सन २०१३-२०१४ च्या अर्थसंकल्पातील मागण्यावरील चर्चेच्यावेळी उपस्थित करण्यात आलेल्या कपात सूचना (कपासू ४०४) ला उत्तर देताना तत्कालीन मा.पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्र्यांनी कपात सूचना उपस्थित केलेल्या सदस्यांना दिलेल्या उतरामध्ये क्रमांक कपासू १९१३/प्र.क्र.१२९/पदुम १४, दि.२९ जुलै २०१३ अन्वये कळविलेले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास तारामुंबरी खाडीतील गाळ काढण्याचे तसेच अन्य कामे राष्टीय कृषी विकास योजनेअतंर्गत प्रस्तावित करण्यात आलेल्या कामास मंजुरी देवून सदरची कामे हाती घेण्यात आलेली आहेत काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.
(३) राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत निधी उपलब्ध न झाल्याने मिठमुंबरी-तारामुंबरी येथे नवीन जेट्टीचे काम ग्रामीण पायाभूत विकास निधी मालिका १९ अंतर्गत नाबार्डच्या अर्थसहाय्यातून करण्यात येणार होते. तथापि नाबार्डकडून निधी प्राप्त न झाल्याने सदर काम हाती घेण्यात आलेले नाही.

---

**ओढा (जि.नाशिक) गावानजीक एकलहरे थर्मल पॉवरच्या बंधाऱ्यापासून सिलरकडे जाणा-या इंडिया बुल्स कंपनीच्या पाईपलाईनची चाचणी सुरु असताना झालेल्या स्फोटाबाबत**

**(३९) २४५५९ (३१-०८-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील ओढा गावानजीक एकलहरे धर्मल पॉवरच्या बंधा-यापासून सिलरकडे जाणा-या इंडिया बुल कंपनीच्या पाईपलाईनची चाचणी सुरु असताना दिनांक २२ एप्रिल २०१५ रोजी वा त्या सुमारास स्फोट झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाईपलाईनच्या स्फोटानंतर पाणी ४० ते ५० फुटापर्यंत वर उडून मोठ्या प्रमाणावर अपघात होऊन रस्त्यावरील वाहनांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या नुसार नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, सदरचे काम किती कालावधील हाती घेण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही, परंतु ओढा गावाजवळ पाण्याची पाईप लाईन फुटली होती.
(२) हे खरे नाही.
(३) श्री.सागर निवृत्ती सहाणे व त्यांचे वडील त्यांच्या कुटुंबियासमवेत दि. २१.४.२०१५ रोजी कारने नाशिकहून ओढाकडे जात असताना ओढा येथे इंडिया बुल्स कंपनीची पाईप फुटल्याने त्या पाण्याच्या प्रवाहात कार सापडून जवळच्या कड्यावर धडकल्याने सागर निवृत्ती सहाणे यास पोटास व छातीस मार लागला असल्याचे आडगांव पोलीस स्टेशनच्या अभिलेखावर नोंद झालेली आहे. त्यासंदर्भात संबंधित सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकांनी श्री.सहाणे यांना विचारणा केली असता त्यांनी सदरचा प्रकार किरकोळ असल्याने तक्रार/फिर्याद दाखल केली नसल्याचे निदर्शनास आणले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सागरपुत्र मच्छिमार सहकारी संस्था ताराबंदर बोर्ली(ता.मुरुड जि.रायगड) या संस्थेचा डिझेल कोटा पूर्ववत सुरु करुन शासनाकडे शिल्लक असलेला डिझेल परतावा देण्याबाबत**

**(४०) २५०२३ (१०-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सागरपूत्र मच्छिमार सहकारी संस्था ताराबंदर बोर्ली (ता.मुरुड, जि.रायगड) या संस्थेचा डिझेल कोटा अन्यायकारकपणे बंद केला असल्याने त्यांना खुल्या बाजारभावाने डिझेल खरेदी करावी लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आहे,
(३) तदनुसार सदरचा डिझेल कोटा बंद करण्याचा आदेश रद्द करुन डिझेल कोटा पूर्ववत सुरु करण्याबाबत तसेच शासनाकडे शिल्लक असलेला डिझेल परतावा देण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :**(१) नाही.

(२) होय. संस्थेच्या एकूण मंजूर डिझेल कोट्यातील नौका पैकी १८ नौकांची बोगस नोंदणी करुन डिझेल वरील मुल्यवर्धीत कर परतावा अनुदानाची रक्कम अपहार केल्याचे प्रथम दर्शनी आढळून आले आहे.

(३) प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय कोकण विभाग, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने याबाबत सखोल चौकशी करुन आपला अहवाल आयुक्त मत्स्यव्यवसाय , मुंबई यांना सादर केला आहे. सदर अहवालाच्या आधारे संबंधीत संस्थेच्या डिझेल पुरवठा थांबविण्यात आलेला असून डिझेल कोटा पूर्ववत करण्यासाठी संस्थेच्या कार्यरत नौकांची पुर्नतपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**तलासरी व डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील सागरी बोटींवर खलाशी म्हणून व इतर राज्यात काम करण्यासाठी जाणाऱ्या खलाशांना बायोमॅट्रिक कार्ड उपलब्ध मिळत नसल्याबाबत**

**(४१) २५७९३ (१०-०८-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी व डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील सागरी बोटींवर खलाशी म्हणून या राज्यासह गुजरात, गोवा, बंगळूर व इतर राज्यात काम करण्यासाठी जाणाऱ्या खलाशांना बायोमॅट्रिक कार्ड मिळत नसल्याची बाब दिनांक ९ जून, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीनुसार सदर बायोमॅट्रिक कार्ड वेळेत उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दाभोळ (ता.गुहागर जि.रत्नागिरी) येथील रत्नागिरी गॅस ॲन्ड पॉवर प्रा.लि.या. प्रकल्पातून सध्या वीजनिर्मिती बंद असल्याबाबत**

**(४२) २५९४० (१०-०८-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभोळ (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील एक हजार ९६० मेगावॅटचा वायुरुप इंधनावर आधारीत रत्नागिरी गॅस ॲन्ड पॉवर प्रा.लि.या. प्रकल्पातून सध्या वीजनिर्मिती बंद असून हा

प्रकल्प लवकरच नव्याने करण्यात येणार असून त्यातून वीज निर्मिती करण्याच्यादृष्टीने प्रयत्न सुरु करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्प नव्याने करण्यासंदर्भात शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे

(३) असल्यास, कंपनीला महावितरणाने स्थिर आकारापेटी सुमारे दोन हजार ३०० कोटी रुपये द्यावेत असा आदेश विद्युत अपिलीय न्यायाधिकरण, नवी दिल्ली यांनी दिला असल्याचे राज्य शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रकल्प नव्याने सुरु करण्यासाठी शासनस्तरावर व्हॅट, एन्ट्री टॅक्स माफ करण्यबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच केंद्र शासनाच्या पॉवर सिस्टीम डेव्हलमेंन्ट फंड (PSDF) मधून आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत भारत सरकारकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) हे खरे आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पैठण येथील मत्स्यबीज केंद्र अधुनिक पध्दतीने सुरु करण्याबाबत**

**(४३) २६०८९ (१०-०८-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण येथील मत्स्यबीज केंद्र अधुनिक पध्दतीने सुरु करण्यासाठी प्रयत्न केले जातील असे आश्वासन मत्स्यव्यवसाय विकास मंत्रीमहोदयांनी नुकतेच माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मत्स्यबीज निर्मिती होत नसल्यामुळे जायकवाडी धरणात अनेक वर्षापासून बीज सोडण्यात आले नाही त्यामुळे धरणातील मासेमारीही कमी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दिलेल्या आश्वासनावर केव्हापर्यंत अंमलबजावणी होणार आहे व त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०९-२०१५) :** (१) होय.

(२) जायकवाडी परिसर वन विभागाकडून पक्षी अभयारण्य घोषित करण्यात आल्यामुळे जलाशयाचे मासेमारी हक्क वन विभागाने अधिग्रहित केले आहेत त्यामुळे जलाशयातील मासेमारी बंद आहे.

(३) कोणत्याही अभयारण्य/राष्ट्रीय उद्यानामध्ये वनेतर कामे करण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाद्वारे स्थापित उच्चस्तरीय सचिव समितीची पुर्व परवानगी आवश्यक असून सदर पूर्व परवानगी प्राप्त झाल्यास जायकवाडी जलाशयामध्ये मत्स्यबीज संचयनाची योजना राबविणे शक्य होईल.

---

## मौजा बोखारा (जि.नागपूर) येथील पाणी पुरवठा योजनेचे काम ठेकेदाराने बंद केल्याबाबत

**(४४) २६४६२ (२९-०७-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा बोखारा (जि.नागपूर ) येथे कोराडी महानिर्मितीने पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्याकरीता रूपये २.१९ कोटीच्या प्रस्तावास माहे जानेवारी, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान शासनाने प्रशासकीय मान्यता दिल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काम सुरु करण्यात आल्यानंतर लगेच कंत्राटदाराने काम बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर काम बंद करणा-या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर पाणी पुरवठा योजनेचे काम सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०९-२०१५) :** (१) महानिर्मिती कंपनीने बोखारा पाणी पुरवठा योजनेकरीता रु.२.१९ कोटीच्या प्रस्तावास सांघिक सामाजिक जबाबदारी अंतर्गत प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

(२) हे खरे नाही. सदर योजनेचे काम दि.३०.६.२०१४ रोजी पूर्ण झाले असून ते एक वर्षापासून सुरळीतपणे कार्यरत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशीम येथील पशू संवर्धन उपायुक्त पद बरेच दिवसापासून रिक्त असल्याबाबत

**(४५) २६५४६ (१०-०८-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशीम येथील पशू संवर्धन उपायुक्त पद बरेच दिवसापासून रिक्त असून या ठिकाणी पुरेशा सोयीसुविधा नसल्याने शासनामार्फत दिनांक २१ एप्रिल, २००० पासून कृत्रिम रेतम व पशू सर्वोपचार चिकीत्सालय सुरु करुन सुध्दा पुरेशा कर्मचारी नसल्यामुळे शेतकऱ्यांचे नितांत हाल होत असल्याने सदर पदे त्वरीत भरण्याची मागणी दिनांक ११ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास शेतकऱ्यांनी जिल्हा प्रशासन व राज्य प्रशासनाकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे त्वरीत भरण्यासाठी शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची  कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-१०-२०१५) :** (१) व (२)  होय, हे अंशत: खरे आहे.

वाशिम येथील जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त हे पद बऱ्याच दिवसांपासून रिक्त होते. सदर पद शासन निर्णय क्र.पसंप्र-१००१/प्र.क्र.२९/(भाग-४)/पदुम-१ मुंबई-३२ दि.२५/५/२००४ अन्वये मंजूर झालेले आहे. सदर पद भरेपर्यंत सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व पशुधन विकास अधिकारी यांचेकडे अतिरिक्त कार्यभार देऊन कृत्रिमरेतने व इतर आवश्यक त्या पशुवैद्यकीय सेवा नियमितपणे पशुपालकांना पुरविण्यात आलेल्या आहेत.

उपआयुक्त पशुसंवर्धन हे पद बदलीने दि.८/६/२०१५ पासून भरण्यात आलेले आहे. वाशिम जिल्ह्यातील पशुंची मर्तुकीबाबत कुठल्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र पुरस्कृत पशूधन विकास योजनेमध्ये वाशीम जिल्ह्याचा समावेश करण्याबाबत

**(४६) २६५५१ (१०-०८-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशीम जिल्ह्यात शासनामार्फत सन २००६-०७ पासून केंद्र पुरस्कृत पशूधन विकास योजना पशूधन विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे, सदर योजना २०११ पासून राज्यातील १८ जिल्ह्यामध्ये लागू करण्यात आली आहे, तथापि, वाशीम जिल्ह्याचा या योजनेमध्ये समावेश करण्यात आला नसून सदर योजनेत वाशीम जिल्हयाचाही समावेश करण्याची मागणी दिनांक ६ मे, २०१५ रोजी रिसोड येथील मुरलीधर टाकरणे व इतरांनी शासनाकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची  कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :** (१) सन २०११ पासुन राबविण्यात आलेल्या केंद्र पुरस्कृत पशुधन विमा येजनेमध्ये वाशिम जिल्ह्याचा समावेश केलेला नाही, हे खरे आहे.

वाशिम जिल्ह्याचा या योजनेमध्ये समावेश करण्याची मागणी दि.०६.०५.२०१५ रोजी रिसोड येथील श्री.मुरलीधर टाकरणे व इतरांनी शासनाकडे केली असल्याचे, दिसुन येत नाही.

(२) सन २०१४-१५ पासून केंद्र शासनाने सदर योजनेचा समावेश राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत केलेला असून, ही योजना राज्यातील सर्व ३४ जिल्ह्यांमध्ये सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून राबविण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील पशुधन अधिका-यांची**
**मोठया प्रमाणात पदे रिक्त असल्याबाबत**

**(४७) २६६६२ (१०-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयात २२ पशुवैद्यकीय केंद्र असताना जिल्हयात फक्त ८ पशुधन अधिकारी कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकापेक्षा अधिक प्रभार पशुधन विकास अधिका-यांकडे असल्यामुळे शेतकरी व पशुपालकांना पशुउपचारासाठी भटकावे लागत असून त्यांच्या पशुधनाला वेळेवर उपचार मिळत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वाशिम जिल्हयात पशुधन विकास अधिका-यांची रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

वाशिम जिल्हयात पशुधन विकास अधिकारी यांची एकूण मंजूर पदांची संख्या २८ (राज्यस्तरीय ७ पदे व जिल्हा परिषदेकडील २१ पदे) आहे. त्यापैकी १३ पदे भरलेली असून एकूण १५ पदे (राज्यस्तरीय ३ व जिल्हा परिषदेकडील १२) रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला असून शेतकरी व पशुपालकांना वेळेवर सेवा पुरविण्यात येत आहे व पशुपालकांची पशुवैद्यकीय सेवा पुरविण्याबाबत कुठलीही गैरसोय झालेली नसून वाशिम जिल्हयातील पशुपालकांना पशुउपचारासाठी भटकावे लागत असल्याबाबतची अथवा पशुंच्या मर्तुकीबाबत कुठल्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) होय, हे खरे आहे.

दि. २३/१/२०१३ च्या दरम्यान रिक्त पदे भरण्याबाबत तात्कालीन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली होती.

(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून ३०० शिफारसपात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी शासनास प्राप्त झालेली असून त्यापैकी साक्षांकन नमुना प्राप्त २९६ उमेदवारांपैकी १४२ उमेदवारांची वेद्यकीय तपासणी करुन व त्याचे चारित्र्य पडताळणी अहवालही शासनास प्राप्त झाले असून त्यांना पदस्थापना देण्यात आलेली आहे पुर्वरीत उमेदवारांची वैद्यकीय तपासणी व पूर्व चारित्र्य पडताळणीचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्यांना पदस्थापना देण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मे.शितल आर्च रेस्टो प्रा.लि. मुंबई यांच्याकडून दुग्धजन्य पदार्थ विक्री कराच्या रकमेतील असलेली तफावत वसूल करण्याबाबत**

**(४८) २६८०९ (१०-०८-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.शितल आर्च रेस्टो प्रा.लि. मुंबई यांच्याकडून वरळी दुग्धशाळेतून वितरीत झालेल्या दुग्धजन्य पदार्थांच्या विक्री किंमतीवरील माहे जानेवारी, २०१४ ते ३१ डिसेंबर, २०१४ या कालावधीतील १ टक्का रॉयल्टीची सुमारे रुपये २,७६,०६,९७३ इतकी रक्कम आजतागायत वसूली झाली नसल्याची बाब माहे जून, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रॉयल्टीची रक्कम तातडीने वसूल करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील वीज ग्राहकांच्या वीज बिलात ४० टक्के दरवाढ करण्याचा प्रस्ताव रिलायन्स कंपनीने सादर केला असल्याबाबत**

**(४९) २६८८४ (१०-०८-२०१५). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वीज ग्राहकांच्या वीज बिलात ४० टक्के दरवाढ करण्याचा प्रस्ताव रिलायन्स कंपनीने सादर केला असल्याचे माहे मार्च, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाटा पॉवरची वीजदरवाढ ६ ते ८ टक्के असताना रिलायन्सची दरवाढ ४० टक्के असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात यत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्रातील विविध प्रकल्पांकरिता लागणारी खासगी जमीन वाटाघाटी करुन थेट खरेदी करण्याबाबत

**(५०) २६९२३ (१०-०८-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील विविध प्रकल्पांकरिता लागणारी खासगी जमीन वाटाघाटी करुन थेट खरेदी करण्याबाबतचे आदेश राज्याच्या महसूल व वन विभागाने नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निर्गमित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशावर केव्हापासून अंमलबजावणी करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या नव्या आदेशानुसार ग्रामीण भागात शहरी भागात, रेडीरकनरच्या दराच्या अडीचपट मोबदला दिला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०९-२०१५) :** (१) हे खरे आहे, खाजगी क्षेत्रातील जमीन सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने घेणे याबाबत शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलबजावणीसाठी लागू झालेला आहे.

(३) हे खरे आहे, ग्रामीण भागात व शहरी भागात अनुक्रमे रेडीरेकनरच्या दराच्या पाचपट व अडीचपट मोबदला दिला जाणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.